लोकमत कोल्हापूर, बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०१५

# आबालाल यांच्यामुळे कला क्षेत्राला वेगळी उंची

## देवानंद शिंदे : शिवाजी विद्यापीठात कलातपस्वी आबालाल रेहमान कलादालनाचे उद्घाटन

कोल्हापूर : कोल्हापूरच्या कला क्षेत्राला वेगळी उंची मिळवून देण्याचे कार्य रेहमान यांनी केले. राजर्षी शाहू महाराजांसारख्या पारखी जोहऱ्यामुळेच रेहमान यांच्यासारखा हिरा कोल्हापूरला मिळाला, याची कृतज्ञ जाणीवही आपण सर्वांनी ठेवायला हवी. कलातपस्वी आबालाल रेहमान कलादालनाची उभारणी करण्यास शिवाजी विद्यापीठाने दिलेले सहकार्य ही या महान कलाकाराला वाहिलेली आदरांजली आहे, अशी भावना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी येथे व्यक्त केली.



शिवाजी विद्यापीठात कलातपस्वी आबालाल रेहमान कला दालनाचे उद्घाटन करताना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे. शेजारी श्यामकांत जाधव, नमिता खोत, अजय दळवी, डॉ. डी. आर. मोरे.

कोल्हापूरच्या कलाक्षेत्रातील अग्रगण्य अशा 'रंगबहार' या संस्थेच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठात 'कलातपस्वी आबालाल रेहमान कलादालन' उभारण्यात आले आहे. या कलादालनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ चित्रकार श्यामकांत जाधव होते.

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या नूतन विस्तारित इमारतीमध्ये हा कार्यक्रम झाला. 'रंगबहार'तर्फे विद्यापीठास समकालीन चित्रकारांच्या कुंचल्यातून साकारलेली सुमारे दीडशे दर्जेदार चित्रे प्रदान करण्यात आली आहेत. पहिल्या टप्प्यात सुमारे ५६ चित्रे कलादालनात प्रदर्शित करण्यात आली आहेत.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, काहीच दिवसांपूर्वी आबालाल रेहमान यांच्या काही कलाकृती मुंबईच्या जे. जे. कलासंग्रहालयात पाहण्यात आल्या. तोपर्यंत त्यांच्याविषयी मी पूर्णतः अनभिज्ञ होतो; पण, त्यांच्या कलाकृती पाहिल्यानंतर त्यांच्या महानत्वाची प्रचिती आली. आपल्या कलाकृतीतून केवळ रंगरेषांचा खेळ न मांडता त्यापुढे जाऊन त्यांचा शरीरशास्त्राचा अभ्यास, तत्कालीन सामाजिक, आर्थिक स्थिती मांडण्याचे कौशल्य यांचा प्रत्यय येतो.

याप्रसंगी बोलताना डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, इतिहास म्हणजे केवळ युद्धांचा, तहाचा किंवा राजघराण्यांची माहिती संकलन नव्हे तर, त्याही पुढे जाऊन संपूर्ण परिसराचा भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय अशा बहुअंगांनी केलेला अभ्यास आहे. कोल्हापूरच्या कला, सांस्कृतिक या बाजूंवर प्रकाशझोत टाकणारा एक स्वतंत्र खंड निर्माण करण्याची आमची योजना आहे. त्यामध्ये आबालाल रेहमान, बाबूराव पेंटर यांच्यासह अनेक महान कलातपस्वींच्या कार्याचा सविस्तर समावेश करण्यात येणार आहे.

अध्यक्षीय भाषणात बोलताना जाधव म्हणाले, आबालाल रेहमान यांनी सुमारे वीस हजारांहून अधिक उत्तमोत्तम कलाकृती निर्माण केल्या. एका पिढीचे काम जणू त्यांनी एकट्याने उभे केल्या. उपलब्ध मोजक्या कलाकृतींतून त्यांच्या महान कार्याची प्रचिती येते. त्यांचे [illegible] भावी पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहील. याप्रसंगी 'रंगबहार'चे अध्यक्ष प्राचार्य अजेय दळवी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी आभार मानले. विजय टिपुगडे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, बीसीयुडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी एन. व्ही. कोंगळे यांच्यासह विजयमाला मेस्त्री, धनंजय जाधव, अमृत पाटील, रियाझ शेख, सर्जेराव निगवेकर, राजाभाऊ उपळेकर, प्रवीण वाघमारे, शैलेश राऊत, राहुल रेपे, विलास बकरे, अभिजीत कांबळे, किशोर पुरेकर, श्रीकांत डिग्रजकर, संजीव संकपाळ, अतुल डाके, व्ही.बी. पाटील, निर्मला कुलकर्णी, उज्ज्वल दिवाण, प्रेमला भोसले, रमेश बिडकर, मंगेश शिंदे, सुरेश पोतदार, वैशाली पाटील, सुनील पोवार आदी मान्यवर, कलारसिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.